ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

माहितीचा प्रवेश, संग्रहण आणि प्रसार करण्यासाठी एक कार्यक्षम माध्यम म्हणून केला जात आहे. इंटरनेट म्हणजे काय तर नेटवर्कचे असे जाळे जे संपूर्ण जगभरात पसरले आहे. इंटरनेटचे हे जाळे जगभरातील सर्व डिजिटल उपकरणांना टॉवर्स आणि कृत्रिम उपग्रहांच्या माध्यमातून वायरलेस कनेक्शनव्दारे एकमेकांना जोडले गेले आहे.

**वाचनसाहित्याचा आढावा** (Review of Literature):

**ममता राणी (२०२०)**

इनोसंट हार्ट्स कॉलेज (जालंधर) मधील व्यवस्थापन आणि आयटी विद्यार्थ्यांमध्ये इंटरनेट आणि ग्रंथालयाच्या वापराची तुलना करण्यासाठी हा अभ्यास करण्यात आला. वाचनालयात विद्यार्थी इंटरनेट प्रस्तावनावापरण्याची अधिक शक्यता असते या गृहितकावर आधारित आहे. प्रश्नावली, वर्णनात्मक संशोधन तंत्र आणि सोयीस्कर सॅम्पलिंग तंत्र दोन्ही वापरून तथ्य गोळा केले गेले. विद्यार्थ्यांनी ग्रंथालय तसेच इंटरनेटचा वापर करावा असे सुचवण्यात आले आहे. ३५% विद्यार्थी ग्रंथालयात वापरतात आणि ५६% इंटरनेट वापरतात असा निष्कर्ष काढण्यात आला. ग्रंथालय अपग्रेड करायची असेल तर डिजिटल लायब्ररीबरोबरच इंटरनेटवरही शोध घ्यावा, अशी सूचना करण्यात आली.

**लोन, फैयाझ अहमद (२०११)**

काश्मीर खोऱ्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील इंटरनेट वापरावरील प्रश्नावली आधारित सर्वेक्षण पद्धतीत असे आढळून आले की संगणक विज्ञानाचे विद्यार्थी इंटरनेटचा सर्वाधिक वापर करतात आणि त्यानंतर अनुक्रमे व्यवसाय आणि वाणिज्य, सामान्य विज्ञान, सामाजिक विज्ञान आणि मानविकीचे विद्यार्थी इंटरनेटचा वापर करतात. व्यवसाय आणि वाणिज्य शाखेचे विद्यार्थी माहितीसाठी इंटरनेट वापरण्यात आघाडीवर आहेत, संगणक शास्त्राचे विद्यार्थी मुख्यत: संवादासाठी वापरतात आणि सामाजिक विज्ञान आणि मानविकीचे विद्यार्थी इतरांच्या तुलनेत त्याचा वापर शैक्षणिक हेतूंसाठी करतात.

**कुमार आणि कौर (२००६):**

यांनी काश्मीर खोऱ्यातील विद्यार्थी इंटरनेटचा वापर माहिती मिळविण्यासाठी कसा करतात. याविषयी अभ्यास केला असता ४८.३% शैक्षणिक समुदाय आठवड्यातून २-३ वेळा इंटरनेट वापरतात, ४०% दररोज आणि ५.६% महिन्यात २-३ वेळा वापरतात. तथ्य विश्लेषणात असेही दिसून आले आहे की बहुसंख्य उत्तरदाते ६९.४% इंटरनेटचा वापर शिक्षणासाठी, ५१.९% संशोधनासाठी, ४७.४% संवादासाठी आणि ३४.७% मनोरंजनासाठी इंटरनेटचा वापर करतात.

**उद्दिष्टे** (Objectives):-

१. विद्यार्थ्यांद्वारे ग्रंथालय आणि इंटरनेटच्या वापराचे विश्लेषण करणे.

२. ग्रंथालयातील माहितीचा स्रोत शोधणे.

३. विद्यार्थ्यांद्वारे ग्रंथालयाच्या वापराच्या वारंवारतेचे मूल्यांकन करणे.

**तथ्य संकलन आणि विश्लेषण** (Data Collection and Analysis):-

सदर संशोधनात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्नित कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांच्या माहिती शोधण्यासाठी इंटरनेटचा वापर यासंदर्भात अभ्यास करण्यात आला. त्यासाठी संरचित प्रश्नावली गुगल फॉर्ममध्ये तयार


ISSN–2277- 8721
EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023
OPEN ACCESS Original Research Article

करण्यात येवून एकूण ७१ महाविद्यालयांना पाठविण्यात आली. त्यापैकी एकूण ६५३ प्रश्नावलीचा प्रतिसाद प्राप्त झाला. जमा झालेल्या प्रश्नावलीचे विश्लेषण सांख्यिकीय पद्धतीने सारणी व आलेख वापरून करण्यात आले.

**सारणी क्र. १ : माहिती मिळविण्यासाठी इंटरनेटचा वापर**

| अ.क्र. | इंटरनेटचा वापर | प्रतिसाद | % |
|---|---|---|---|
| १. | सायबर कॅफेमध्ये जावून इंटरनेटचा वापर | २४३ | ३७.२१ |
| २. | महाविद्यालयातील संगणक विभागात जावून | २४९ | ३८.१३ |
| ३. | ग्रंथालयात इंटरनेटचा वापर | १९० | २९.१० |
| ४. | वसतिगृहात इंटरनेटचा वापर | ०८३ | १२.७१ |
| ५. | स्वतःचा घरी इंटरनेटचा वापर | ४२४ | ६४.९३ |
| ६. | इतर ठिकाणी इंटरनेटचा वापर | १३२ | २०.२१ |

**आलेख क्र. १ : माहिती मिळविण्यासाठी इंटरनेटचा वापर**




सारणी क्र. १ व आलेख क्र. १ नुसार विद्यार्थ्यांना विचारण्यात आले होते की, तुम्ही माहिती मिळविण्यासाठी इंटरनेटचा वापर कुठे करता? त्यासंदर्भात प्रश्न विचारला असता, ६४.९३% प्रतिसादकर्त्यांनी 'स्वतःचा घरी इंटरनेटचा वापर' म्हणून प्रतिसाद दिला आहे कारण आज प्रत्येकाकडे मोबाईल उपलब्ध असल्याने तत्काळ त्यावर माहिती मिळविता येते, ३८.१३% प्रतिसादकर्त्यांनी 'महाविद्यालयातील संगणक विभागात जावून माहिती शोध' म्हणून प्रतिसाद दिलेला आहे, ३७.२१% प्रतिसादकर्त्यांनी 'सायबर

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023


OPEN ACCESS Original Research Article

कॅफेमध्ये जावून इंटरनेटचा वापर' म्हणून प्रतिसाद दिलेला आहे, २९.१०% प्रतिसादकर्त्यांनी 'ग्रंथालयात इंटरनेटचा वापर' म्हणून प्रतिसाद दिलेला आहे, २०.२१% प्रतिसादकर्त्यांनी 'इतर ठिकाणी इंटरनेटचा वापर' म्हणून प्रतिसाद दिलेला आहे तर १२.७१% प्रतिसादकर्त्यांनी 'वसतिगृहात इंटरनेटचा वापर' म्हणून प्रतिसाद दिलेला आहे.

**सारणी क्र. २ : ग्रंथालयात इंटरनेट सेवा उपलब्ध**

| अ.क्र. | ग्रंथालयात इंटरनेट सेवा उपलब्ध | प्रतिसाद | % |
|---|---|---|---|
| १. | होय | ३९५ | ६०.४९ |
| २. | नाही | २५८ | ३९.५१ |
| | एकूण | ६५३ | १०० |

**आलेख क्र. २ : ग्रंथालयात इंटरनेट सेवा उपलब्ध**




सारणी क्र. २ व आलेख क्र. २ नुसार विद्यार्थ्यांना विचारण्यात आले होते की तुमच्या ग्रंथालयात इंटरनेट सेवा उपलब्ध आहे काय? यासंदर्भात ६०.४९% प्रतिसादकर्त्यांनी 'होय' म्हणून प्रतिसाद दिलेला असून ३९.५१% प्रतिसादकर्त्यांनी 'नाही' म्हणून प्रतिसाद दिलेला आहे.

**सारणी क्र. ३ : विद्यार्थी इंटरनेटचा वापर किती वेळ करतात**

| अ.क्र. | विद्यार्थी इंटरनेटचा वापर किती वेळ करतात | प्रतिसाद | % |
|---|---|---|---|
| १. | दररोज | ४४१ | ६७.५३ |
| २. | आठवड्यातून एकदा | ०८६ | १३.१७ |
| ३. | क्वचित | ०६६ | १०.११ |
| ४. | कधीही नाही | ०३२ | ०४.९० |
| ५. | पंधरा दिवसातून एकदा | ०१९ | ०२.९१ |
| ६. | महिन्यातून एकदा | ००९ | ०१.३८ |
| | एकूण | ६५३ | १०० |


ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

**आलेख क्र. ३ : विद्यार्थी इंटरनेटचा वापर किती वेळ करतात**




सारणी क्र. ३ व आलेख क्र. ३ नुसार विद्यार्थ्यांना विचारण्यात आले होते की, तुम्ही माहिती मिळविण्यासाठी तुम्ही इंटरनेटचा वापर किती वेळ करतात? त्यासंदर्भात प्रश्न विचारला असता, ६७.५३% प्रतिसादकर्त्यांनी 'दररोज इंटरनेटचा वापर' म्हणून प्रतिसाद दिला आहे, १३.१७% प्रतिसादकर्त्यांनी 'आठवड्यातून एकदा इंटरनेटचा वापर' म्हणून प्रतिसाद दिलेला आहे, १०.११% प्रतिसादकर्त्यांनी 'क्वचित इंटरनेटचा वापर' म्हणून प्रतिसाद दिलेला आहे, ४.९०% प्रतिसादकर्त्यांनी 'इंटरनेटचा वापर कधीही केला नाही' म्हणून प्रतिसाद दिलेला आहे, २.९१% प्रतिसादकर्त्यांनी 'पंधरा दिवसातून एकदा इंटरनेटचा वापर' म्हणून प्रतिसाद दिलेला आहे तर १.३८% प्रतिसादकर्त्यांनी 'महिन्यातून एकदा इंटरनेटचा वापर' म्हणून प्रतिसाद दिलेला आहे.

**सारणी क्र. ४ : इंटरनेट वापराचा उद्देश्य**

| अ.क्र. | इंटरनेट वापराचा उद्देश्य | प्रतिसाद | % |
|---|---|---|---|
| १. | शैक्षणिक कामासाठी | ५४९ | ८४.०७ |
| २. | मनोरंजनासाठी | २१४ | ३२.७७ |
| ३. | बातम्यांसाठी | २५४ | ३८.९० |
| ४. | ई-मेल साठी | २१४ | ३२.७७ |
| ५. | माहिती मिळविण्यासाठी | ३९३ | ६०.१८ |
| ६. | इतर | १०५ | १६.०८ |


ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

**आलेख क्र. ४ : इंटरनेट वापराचा उद्देश्य**





सारणी क्र. ४ व आलेख क्र. ४ नुसार विद्यार्थ्यांना विचारण्यात आले होते की, तुम्ही इंटरनेट कोणत्या उद्देश्याने वापरतात? त्यासंदर्भात प्रश्न विचारला असता, ८४.०७% प्रतिसादकर्त्यांनी 'शैक्षणिक कामासाठी इंटरनेटचा वापर' म्हणून प्रतिसाद दिला आहे, ६०.१८% प्रतिसादकर्त्यांनी 'माहिती मिळविण्यासाठी इंटरनेटचा वापर' म्हणून प्रतिसाद दिलेला आहे, ३८.९०% प्रतिसादकर्त्यांनी 'बातम्यांसाठी इंटरनेटचा वापर' म्हणून प्रतिसाद दिलेला आहे, ३२.७७% प्रतिसादकर्त्यांनी 'ई-मेल साठी' व मनोरंजनासाठी इंटरनेटचा वापर म्हणून प्रतिसाद दिलेला आहे, तर १६.०८% प्रतिसादकर्त्यांनी 'इतर गोष्टींसाठी इंटरनेटचा वापर' म्हणून प्रतिसाद दिलेला आहे.

**सारणी क्र. ५ : ग्रंथालयाव्यतिरिक्त विद्यार्थी माहिती कशी शोधतात**

| अ.क्र. | ग्रंथालयाव्यतिरिक्त विद्यार्थी माहिती कशी शोधतात | प्रतिसाद | % |
|---|---|---|---|
| १. | इतर ग्रंथालयांना भेट देवून | २२८ | ३४.९२ |
| २. | वाचनसाहित्य खरेदी करून | १८४ | २८.१८ |
| ३. | वर्ग मित्रांकडून उसनवारीने घेऊन | १७९ | २७.४१ |
| ४. | इंटरनेटद्वारे शोधून | ४२२ | ६४.६२ |
| ५. | मोबाईलद्वारे शोधून | २९१ | ४४.५६ |

ISSN–2277- 8721
EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023
OPEN ACCESS Original Research Article

**आलेख क्र. ५ : ग्रंथालयाव्यतिरिक्त विद्यार्थी माहिती कशी शोधतात**




सारणी क्र. ५ व आलेख क्र. ५ नुसार विद्यार्थ्यांना विचारण्यात आले होते की, आपणास आवश्यक असलेली माहिती जी ग्रंथालयात तुम्हास मिळत नाही ती तुम्ही कशी मिळविता? त्यासंदर्भात प्रश्न विचारला असता, ६४.६२% प्रतिसादकर्त्यांनी ‘इंटरनेटद्वारे माहिती शोध’ म्हणून प्रतिसाद दिला आहे, ४४.५६% प्रतिसादकर्त्यांनी ‘मोबाईलद्वारे माहितीचा शोध घेवून’ म्हणून प्रतिसाद दिलेला आहे, ३४.९२% प्रतिसादकर्त्यांनी ‘इतर ग्रंथालयांना भेट देवून माहितीचा शोध’ म्हणून प्रतिसाद दिलेला आहे, २८.१८% प्रतिसादकर्त्यांनी ‘वाचनसाहित्य खरेदी करून घेऊन माहितीचा शोध’ म्हणून प्रतिसाद दिलेला आहे तर २७.४१% प्रतिसादकर्त्यांनी ‘वर्ग मित्रांकडून उसनवारीने घेऊन माहितीचा शोध’ म्हणून प्रतिसाद दिलेला आहे.

**निष्कर्ष** (Conclusion):-

१. जास्तीतजास्त ६४.९३% प्रतिसादकर्त्यांनी ‘स्वतःचा घरी इंटरनेटचा वापर’ म्हणून प्रतिसाद दिला आहे तर कमीतकमी १२.७१% प्रतिसादकर्त्यांनी ‘वसतिगृहात इंटरनेटचा वापर’ म्हणून प्रतिसाद दिलेला आहे.

२. जास्तीतजास्त ६०.४९% प्रतिसादकर्त्यांचा मते ग्रंथालयात इंटरनेट सेवा उपलब्ध आहे.

३. जास्तीतजास्त ६७.५३% प्रतिसादकर्त्यांनी ‘दररोज इंटरनेटचा वापर’ म्हणून प्रतिसाद दिला आहे, तर कमीतकमी १.३८% प्रतिसादकर्त्यांनी ‘महिन्यातून एकदा इंटरनेटचा वापर’ म्हणून प्रतिसाद दिलेला आहे.

४. जास्तीतजास्त ८४.०७% प्रतिसादकर्त्यांनी ‘शैक्षणिक कामासाठी इंटरनेटचा वापर’ म्हणून प्रतिसाद दिला आहे, तर कमीतकमी १६.०८% प्रतिसादकर्त्यांनी ‘इतर कामासाठी इंटरनेटचा वापर’ म्हणून प्रतिसाद दिलेला आहे.

५. जास्तीतजास्त ६४.६२% प्रतिसादकर्त्यांनी ‘इंटरनेटद्वारे माहिती शोध’ म्हणून प्रतिसाद दिला आहे तर कमीतकमी २७.४१% प्रतिसादकर्त्यांनी ‘वर्ग मित्रांकडून उसनवारीने घेऊन माहितीचा

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

शोध' म्हणून प्रतिसाद दिलेला आहे.

**संदर्भ सूची:**


1. Kumar R and Kaur A (2006) Internet use by teachers and students in engineering colleges of Punjab, Haryana, and Himachal Pradesh states of India: An analysis, *Electronic Journal of Academic and Special Librarianship*, 7 (1).
2. Kumar, K., & Naik, L. (2015). Usage of Wi-Fi Service among Users of Bangalore Medical College and Research Institute Library, Bangalure. *Indian Journal of Applied Research*, 5 (6), 421-23.
3. Loan, Fayaz Ahmad (2011). Internet use by the college students across disciplines: a study. *Annals of Library and Information Studies*, 58, 118-27.
4. Mamta Rani (2020). A study on Library and Internet usage by Students in Innocent Hearts collage of Management & I.T. *International Journal of Research and Analytical Reviews (IJRAR)*, 7 (1), 155-60.
5. Naik, Lokesha and Kumar, Kishore (2019). Internet use Among Faculty and Students of College Libraries in Bangalore, India: A Study. *Library Philosophy and Practice (e-journal)*, 2235.


*Cite this Article:*

*** प्रा. क. श. सोनवणे व **प्रा. डॉ. चौधरी ह. म.** *(2023). महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची माहितीची गरज पूर्ण करण्यासाठी इंटरनेटचा वापर*, ***Electronic International Interdisciplinary Research Journal***, *XII, Issues – VI (Special Issues-I), Nov-Dec, 2023*, ***263-270.***